# प्रकरण चौथे - मालोजीराव यांची कारकिर्द (1935 ते 1948 )

## प्रकरण चौथे

## मालोजीराव यांची कारकिर्द( उतरार्ध )–

## ( 1935 ते 1948 )

मागील प्रकरणात मालोजीराजे यांनी आपल्या हातात राज्यधिकार घेतल्यापासून म्हणजेच 1917 पासून ते 1935 पर्यन्त केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यांनी या कालखंडात अनेक सामाजिक , आर्थिक, शैक्षणिक ,शेतीविषयक सुधारणा केल्या व फलटण संस्थान भरभराटीस आले. याकाळातील महत्वाच्या घटनांची माहिती मागील प्रकरणात दिलेली आहे.

महाराजांच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. फलटण संस्थानबाहेर सुध्दा मुंबई प्रांतात त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थेशी संबंध आलेला आहे. इंग्रज सरकारशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते . त्यांच्या कारकिर्दीत इंग्रज दरबारीसुध्दा फलटण संस्थानची इभ्रत वाढलेली दिसून येते. सन 1935 पासून तर महाराजांच्या कामाचा व्याप वाढत गेला. जागतिक इतिहासात अनेक महत्वाच्या घडामोडी घडत होत्या, लोकशाहीचे वारे सगळीकडे वहात होते , महाबलाढ्य ब्रिटिश लष्करी सत्ता कमकुवत होत होती. भारतातील स्वातंत्र्य चळचळीचा जोर वाढत होता. सन 1939 ला जागतिक दुसरे महायुध्द सुरू झाले ,त्यापूर्वी 1935च्या कायद्याने ब्रिटिश सत्तेने भारताला काही सवलती जाहिर केल्या. 1942 ची चलेजाव चळवळ महात्मा गांधीनी पुकारली. 1946 ला भारतात हंगामी सरकार अस्तित्वात आले व 1947 ला भारत स्वातंत्र झाला, पुढे 1948 ला भारतात सर्व संस्थाने विलीन होऊन भारत एकसंघ झाला.

मालोजीराजे यांना राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय घडामोडींची जाण होती. आपल्या सभोवती जे जे घडत आहे ते ते डोळसपणे ते पहात होते. ब्रिटिश सत्ता भारतात फार काळ टिकणार नाही त्याची जाणीव त्यांना झाली होती. म्हणून त्यांनी सुरूवातीपासूनच आपल्या संस्थानात पुरोगामी धोरण स्विकारले होते. संस्थानातील राज्यकारभार टप्याटप्याने आपल्या प्रजेच्या हाती देण्यात हो जाणकार संस्थानिक तयार होता. म्हणूनच त्यांनी संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीचा 1928–29 पासूनच स्विकार केलेला दिसतो,

1942 ला स्वतंत्र कायदा करून कायदेमंडळाला ज्यादा अधिकार दिलेले आहेत. भारतातील लोकशाहीचे मनपूर्वक स्वागत केलेले आहे व आपले फलटण संस्थान हे आनंदाने मुंबई प्रांतात विलीन केले आहे व नंतर स्वंतत्र भारताचा नागरिक म्हणून कॉंग्रेस पक्षातही काम केले आहे असा हा निर्मळमनाचा थोर राजा काळाच्या प्रवाहाबरोबर बदलत गेलेला आहे.

ह्या प्रकरणात 1935-48 ह्या कालखंडात त्यांनी केलेले कार्य , महत्वाच्या घटना , फलटण संस्थानातील प्रजापरिषद चळवळ व फलटण संस्थानचे झालेले विलीनीकरण याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

मालोजीराजे व नरेंद्र मंडळ

ब्रिटिश काळात हिंदुस्थानाचे दोन विभाग झालेले होते. एक बिटिश इंडिया व दुसरा संस्थानिकाचा भारत-भारतात जवळजवळ 563 संस्थानकि होते. भारतीय संस्थानिकांचे काही प्रश्न होते, म्हणून मॉन्टेग्यु-चेम्सफोर्ड रिपोर्ट मध्ये भारतातील संस्थानीकांचे एक मंडळ असावे अशी शिफारस केलेली होती. आणि ह्या पार्श्वभूमिवर 8 फेब्रुवारी 1921 ला नरेंद्र मंडळांची (Chamber of Princes ) स्थापना झाली.

वेळोवेळी हे नरेंद्र मंडळ भारत सरकारशी चर्चा करीत व आपले प्रशन सोडवत वर्षातुन एकदा नरेंद्र मंडळाची बैठक व्हॉयसराइ च्या अध्यक्षेतेखाली होत असे. नरेंद्र मंडळाचा चॅन्सलर असे व इतर संस्थानचे प्रतिनिधी ह्या मंडळावर काम करत असत.

फलटण हे एस.एम.सी.18 संस्थानापैकी एक संस्थान होते .श्रीमंत मालोजीराव यांचे काम समाधानकारक होते म्हणून त्यांना नरेंद्र मंडळावर या संस्थानाच्या वतीने 1931 पासून प्रतिनिधीत्व केलेले आहे."[1] 1931 ते 1939 पर्यन्त त्याने सातारा गट संस्थानिक यांचे प्रतिनिधीत्व करून भारत सरकार व नरेंद्र मंडळमध्ये या लहान संस्थानिकांची बाजू ,प्रश्न हिरीरीने मांडले. नरेंद्र मंडळाचा एक अभ्यासू सभासद म्हणून त्यांची ख्याती होती. इतर संस्थानीक त्यांना मान देत होते. 1939 नंतर त्यांनी आपली ही जागा नरेंद्र मंडळातील प्रतिनिधीत्व जत संस्थानच्या राजास दिली.

---

1 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल 1931-32 - पृ.5-6

ह्या संबंधी 1939-40 च्या फलटण संस्थानाच्या प्रशासकिय अहवालात खालील माहिती दिलेली आहे.

"Shrimant Raje Saheb was a Representative Member in the Chamber of Princes Since 1931, representing Group-III consisting of Bhor, Akalkot, Rundh, Phaltan, Jath and Surgana State. Shrimant Raje Saheb did not seek re-election in October 1939 and Shrimant Raje Saheb of Jath was returned unopposed to represent Group-III.[2]

नेरंद्र मंडळाचा एक प्रतिनिधि म्हणून मालोजीराव 1933 ला इंग्लंडला गोलमेज परिषदेला गेले होते आणि तिथे संस्थानिकांचे प्रश्न भारत मंत्री व जॉईन्ट पार्लमेंटरी कमिटीपूढे मांडलेले आहेत. त्यांच्या बरोबर त्यांचे दिवाण गोडबोले हे पण होते आणि त्यांची इंग्लड भेट यशस्वी झालेली दिसते.[3]

मालोजीराजे 27 मे 1933 ला इंग्लडला गेले आणि लंडनमध्ये भरणा-या गोलमेज परिषदेमध्ये त्यांनी संस्थानिकांचे प्रशन हिरीरीने मांडलेले दिसतात. त्यांच्या बरोबर राजकुमारी सरोजनीदेवी ह्यापण होत्या.

1932-33 च्या फलटण संस्थानच्या अहवालामध्ये त्यांच्या इंग्लंड भेटी संबंधी पुढील वृतांत मिळतो --

" The Ruler of Phaltan Sailed for England on 27th May 1933 by the P. and O. Steamer, S.S. Narkunda for being present in London at the time of the hearing of evidence before the Joint Select Committee on behalf of the Rulers of Akalkot, Rundh, Bhor, Kurundwad, Jamkhandi, Jath, Miraj senior, Miraj junior,

---

2 फलटण संस्थानचा वार्षिक पशा.अहवाल - सन 1939-40 - पृ.6

3 फलटण संस्थानाचा वार्षिक प्रशासकिय अहवाल सन- 1932-33 - पृ.3

**Phaltan and Ramdurg States in the Satara and S.M.C. groups of the Deccan, Shrimant Rajkumari Sarojini Devi alias Akkasaheb accompanied him during this visit."[4]**

त्यांच्या अनुपस्थितीत फलटण संस्थानच्या राज्यकारभाराचे अधिकार त्यांची राणी लक्ष्मीदेवी यांच्याकडे सोपविले होते व त्यांना सल्लागार म्हणून त्यांचे वडिल श्रीमंत शंभुसिंग जाधवराव यांची नेमणूक केली होती. मालोजीरावांच्या गैरहजेरीत लक्ष्मीदेवीने फलटण संस्थानचा राज्यकारभार चांगला चालवला होता."[5]

मालोजीराजांचे ब्रिटिश सरकारशी संबंध पहिल्यापासूनच चांगले व मित्रत्वाचे असल्याने बिटिश सम्राटने त्याचा विचार करून त्यांना 1933 मध्ये "राजा" हा किताब कायमस्वरूपी अधिकृतरित्या दिलेला आहे. त्यावरून इतर संस्थानिकांत फलटण संस्थानचा राजकिय दर्जा वाढलेला आहे."[6]

तसेच राजकियदृष्टया 1933 पासून फलटण संस्थानचा दर्जा वाढून फलटण संस्थान हे व्हॉयसराईच्या अधिपत्याखली 1 एप्रिल 1933 पासून आले ही एक ऐतिहासिक महत्वाची राजकिय घटना होय. येथुन पुढे मुंबई प्रातांशी संबंध न राहता सरळ भारत सरकारशी फलटण संस्थानाचा संबंध आला त्यासंबंधी पुढील वृतांत महत्वाचा आहे--

**"The most noteworthy event of Political importance during the year was the transfer of political relations of this State from the Bombay Government to the Government of India from the 1st of April, 1933 in accordance with the recommendations made in the Montague-Chelmsford Reforms Scheme, Representations in this respect had been made to the Government of India for a long time and it is a matter of satisfication that the change is now effected and this State is brought into Political relations with the Government of India from the above date through the Agent to the Governor General for the Deccan State and Resident at Kolhapur."[7]**

---

4 फलटण संस्थानचा प्रशासकिय अहवाल-सन 1932-33 - पृ.5

5 कित्ता

6 कित्ता - पृ.4

अशारीतीने फलटण संस्थानचा राजकिय दर्जा वाढण्यास मालोजीरावांचे समाधानकारक प्रशासनच जबाबदार होते. मालोजीरावांचे मुंबई प्रातांचे गव्हर्नर ,सातारा कलेक्टर ,कोल्हापूर चे पॉलिटीकल एजंट व व्हॉयसराय यांच्याशी सबंध मैत्रीपूर्ण होते.

<u>कर्तबगार सचिव श्री बापूसाहेब गोडबोले</u>

फलटण संस्थानचे दिवाण श्री. के.व्ही. गोडबोले ,बी.ए. एलएल.बी. , यांचा सुध्दा फलटण संस्थानाच्या प्रशासनात सिंहाचा वाटा होता म्हणून 4 जून 1934 ला त्यांना " रावसाहेब " हा किताब ब्रिटिश सरकारने दिलेला आहे."[8]

श्री राजेसाहेबंच्या राजवटीत त्यांना ज्या एका व्यक्तीने निर्भिडपणे साथ दिली ,तिचा येथे उल्लेख न करणे अनुचितच ठरेल. ही व्यक्ती म्हणजे त्यांचे दीर्घकाळ असलेले दिवाण बापूसाहेब गोडबोले ही होय. श्री. गोडबोले हे फलटण हायस्कुलोत शिक्षक म्हणून आले, पुढे काही काळाने ते मुन्सफ म्हणून आले. आणि सुमारे 18 वर्षे ते दिवाण म्हणून होते. गोलमेज परिषदेच्या वेळी त्यांनी केलेल्या कामगिरीचा वर उल्लेख आलेलाच आहे. त्याशिवाय फलटणमधील हरएक सुधारणा यश्स्वी करून दखिविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केलेला आहे. एखादा दिवाण संस्थानी राजवटीत आपले श्रेष्ठ स्थान इतक्या दीर्घ काळ राखु शकतो हीच एक गोष्ट त्यांच्या कर्तबगारीची द्योतक आहे आणि आपली ही दिवाणगिरी त्यांनी भाटगिरी करून संभाळली नाही तर आपल्या कर्तव्याची जबाबदारी पार पाडून संभाळली."[9]

<u>मुंबईचे गव्हर्नर ना. ब्रबोर्न यांची फलटणला भेट</u> –( 1936 )–

सन 1927 ला मुंबई चे गव्हर्नर विल्सन यांनी फलटण संस्थानास भेट देऊन त्यांनी समाधान व्यक्त केजे होते. त्यानंतर दुसरे मुंबई चे गव्हर्नर ब्रेबोर्न याने सन 1936 ला फलटण संस्थानास भेट दिलेली दिसते. या भेटीत काही सवलती फलटण संस्थानास दिलेल्या आहेत. त्याचा वृतांत मी खाली देत आहे.

---

8 फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल सन 1932–33 – पृ.2.

9 फलटण संस्थानचा वार्षिक प्रशा.अहवाल–सन–1934–35 – पृ.103.

"आपल्या हक्काबाबत श्रीमंत मालोजीराव अतिशय जागरूक असत, फलटणला साखरेचा कारखाना सुरू झाल्यावर साखरेवरील कर ब्रिटिश सरकार मागू लागले पण कारखाना संस्थानी हद्दीत असल्याने हा कर गोळा करण्याचा न्याय हक्क संस्थानचा होता, तेव्हा त्या थेट वरपर्यन्त जाऊन श्रीमंतांनी गोडबोले दिवाण यांच्याकरवी अनुकूल निर्णय मिळवला, हा कर संस्थानाला मिळू लागल्याने संस्थानाचे उत्पन्न काही लक्षांनी वाढले अशा महत्वाच्या कामात रा.ब. गोडबोले यांचे श्रीमंतांना मौलीक सहकार्य मिळाले . श्रीमंतांच्या या झुंजार वृत्तीची व योग्यतेची कल्पना असल्याने मुंबईचे गव्हर्नर ना.ब्रेबोर्न सन 1936 मध्ये फलटणला आले असता त्यांनी त्याबाबत गौरवपर उद्गार काढले ."[10] तसेच विलायतेत असताना श्रीमंतांनी कोणती कामगिरी केली की ज्यायोगे प.वा.लॉर्ड ब्रेबोर्न यांनी जाहीर रीतीने फलटणला एका भोजनाच्या प्रसंगी " **I had a personal knowledge of the high reputation which the Raje Saheb and his able Diwan had established for themselves and their State in London by the their Public Spirit and Self-less work".**[11]

वरील उद्गारावरून मालोजीराजांचे गव्हर्नरच्या दरबारात किती वजन होते हे दिसून येते.

<u>फलटण संस्थान महिला मंडळाची स्थापना</u>– ( 1937 )

मालोजीराजे त्यांच्या सुविद्य पत्नी राणी लक्ष्मीदेवी यांनी संस्थानातील स्त्रीयांच्या उन्नतीसाठीही विशेष प्रयत्न केले होते . संस्थानात सन 1917 पासूनच पडदा पध्दत बंद केली होती. दरबारात राणीसाहेब गोशाशिवाय येऊन बसत. मालोजीराजांच्या मार्गदर्शनाखाली राणीसाहेबांनी स्त्रियांच्या प्रगतिसाठी विशेष काम केलेले आहे. संस्थानात 1928 ला " सगुणाबाई मॅटरनिटी हॉस्पिटल" स्थापन केले होते. या दवाखान्यात सर्वजातीधर्माच्या स्त्रियांना मोफत औषधोपचार केले जात होते. राणीसाहेबांनी आपली मुलगी सुध्दा इतर मुलींच्या शाळेत पाठवलेली होती. यावरून राणीसाहेबांची समानतेची वागणूक दिसून येते.

---

10 श्री मालोजीराजे सत्कार अंक सन 1957– ग.म.वीरकर यांचा लेख – पृ.44

11 कित्ता – पृ.18

1936 ला अखिल भारतीय स्त्रीपरिषद अहमदबाद येथे भरली होती. त्या परिषदेत राणीसाहेब हजर होत्या, पुढे 1937 ला अहमदाबाद येथेच भरलेल्या दुस–या आखिल भारतीय स्त्री परिषदचे अध्यक्षपद राणी लक्ष्मीबाई यांना देण्यात आले."[12] स्त्री उन्नतीचे कार्य राणीसाहेब संस्थानात व संस्थानाबाहेरही करीत होत्या. संस्थानात प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासाठी मनमोहन राजवाडयात 1936 पासून त्यांनी वर्ग सुरू केले होते. ह्या त्यांच्या कार्यासाठी पुढे 1938 ला ब्रिटिश सरकारकडून राणीसाहेबांना " कैसर–इ–हिंद " हा किताब त्यांना मिळाला." [13]

तसेच त्यांनी फलटण संस्थानात महिला मंडळाची स्थापना 17 मार्च 1937 ला केली व राणी लक्ष्मीबाई ह्या मंडळाच्या पदसिध्द अध्यक्ष बनल्या."[14] ह्या मंडळात 235 स्त्री सदस्य होत्या. स्त्रियांना मंडळामार्फत इंग्रजी व मराठी शिक्षण दिले जात होते. तसेच ह्या मंडळा मार्फत पिंपरद येथे साक्षरतेचे वर्गही घेतले जात .तसेच प्रत्येक 15 दिवसाला या मंडळाची बैठक घेतली जात व त्यात राणी लक्ष्मीबाई मार्गदर्शन करीत असत. खेडोपाडी शिक्षणाचे महत्व पटविण्यासाठी मंडळामार्फत व्याख्याने आयोजित केली जात तर वाचनाची आवड स्त्रीयांमध्ये निर्माण व्हावी म्हणून फलटण ,पिंपरद,गुणवरे याठिकाणी या मंडळामार्फत वाचनालये सुरू केलेली होती . दरबारमार्फत ह्या मंडळाच्या कार्यास प्रोत्याहन मिळे व आर्थिक अनुदानही मिळे."[15]

पुढे राणीसाहेबांनी स्वतंत्र भारतात सुध्दा स्त्रीउन्नतीचे काम सुरूच ठेवले होते. सन 1955 ला त्यांच्याच पुढाकाराने फलटण सारख्या लाहानशा शहरात "आखिल भारतीय स्त्री परिषद " घेण्यात आली."[16]

---

12 बाळसाहेब पाटील : सत्यवादी व संस्थानावरील विशेष अंक –पृ. 134

13 कित्ता – पृ. 134

14 फलटण संस्थानचा प्रशासकिय अहवाल सन 1936–37 – पृ. 35

15 कित्ता

16 प्रा. गळसासी: विकासाची राणी लक्ष्मीदेवी स्मृति अंक सन 1985– पृ.21

पूर्वी राणीसाहेब बरीच वर्षे महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी चालविलेल्या सेवासदन सोसायटी, पुणा या संस्थेच्या त्या अध्यक्ष होत्या व मालोजीरावांनी या संस्थेस बरीच आर्थिक मदतही केलेली दिसते.[17] सन 1937-38 ला फलटण दरबारामार्फत सेवासदन सोसायटी ,पुणे या संस्थेस 200 रूपये अनुदान दिलेले दिसते.[18]

"श्री सौ. लक्ष्मीबाई राणीसाहेब मोठया वक्त्या बनल्या असून स्त्रियांच्या व बालकांच्या उन्नतीचे कार्य मोठ्या उत्साहाने व श्रम घेऊन पार पाडीत आहेत. त्या पुणे सेवासदन सोसायटीच्या व हिंगणे स्त्री - शिक्षण संस्थेच्या अघक्ष असून स्त्रियांचे शिक्षण व आरोग्य विषयक बाबतीत त्या सुधारणा करण्याचा सतत प्रयत्न करतात. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या असून त्यांची श्रीज्ञानेश्वर-भक्ति अतुल आहे. त्यांच्या भक्तीचे दृश्य फल म्हणजे त्यांच्या प्रोत्साहनाने फलटण येथे नुकतेच बांधले गेलेले श्रीज्ञानेश्ववर महाराज यांचे मंदिर होय व त्यांचे सर्व कार्य श्रीमंतास अनुरूपच आहे."[19]

<u>1936 पर्यन्त केलेल्या कार्याची गॅझेटमध्ये प्रसिध्द--</u>

मालोजीरावांने 1935 अखेर जे संस्थानात व संस्थानाबाहेर महत्वाचे कार्य केले त्याची सर्वांना माहिती व्हावी म्हणून 15 डिसेबर 1936 च्या फलटण स्टेट गॅझेटमध्ये खालील माहिती प्रसिध्द झालेली आहे.

"श्रीमंत सरकार मेजर राजा मालोजीराव मुधोजीराव उर्फ नानासाहेब नाईक निंबाळकर राजेसाहेब संस्थान फलटण यांचे सेवेशी ,

1. सन 1929 मध्ये नियमबध्द राज्यघटना अस्तित्वात आणली.
2 फलटण संस्थानात लोकल बोर्डाची स्थापना,
3 किशोरसिंह मोटार सर्व्हिस कंपनीची स्थापना,
4 बँक कॅनॉलसाठी इंग्रज करारमदार कायम केले,
5 शेती पाण्याखाली आली व नवीन गरजा शेतक-यांना पुरविल्या,
6 संस्थानात सेंट्रल बँकेची निर्मिती व सहकारी सेवा सोसायट्यांचे जाळे निर्माण केले,
7 साखर कारखान्याची स्थापना,

---

18 फलटण संस्थानाचा प्रशासकिय अहवाल सन 1937-38 - पृ.9

19 मालोजी सत्कार अंक सन 1957- पृ.88

8 शिक्षणाची सोय मोफत केली. 1) प्राथमिक शिक्षण मोफत 2) दुय्यम शिक्षणही अत्यंत अल्पखर्चात निर्माण केले, 3) शिक्षकाकडून शिक्षणशास्त्राचा अभ्यास पूर्ण करणे, 4) शिक्षणाधिकारी याची नियुक्ती 5) फलटण शहराला पीण्यासाठी मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा त्यांनी केला.

9 दक्षिणेतील संस्थानाच्या राजकारणात त्यांनी लक्ष घातले.

श्रीमंत सकल सौभाग्यसंपन्न मातूश्री लक्ष्मीदेवी राणीसाहेब यांनी आपल्या अनेक गुणांनी आपल्या कारकिर्दीत शोभा आणली, त्यांनी सामाजिक कार्यात लक्ष घालून खालील संस्थाना मदत केली.--

1)श्रीसगुनामाता सुतिकाग्रह,

2)हायस्कुलमधील स्त्री शिक्षणाला दिलेली चालना,

3)पडदा या अनिष्ठ पध्दतीचा त्यांनी केलेला त्याग."[20]

सर्व धर्म भावना--

फलटण संस्थानात सर्वधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहात होते. मालोजीराव हे सर्व धर्मांना समानतेचेच वागणूक देत होते कारण ते सहिष्णूतावादी होते. फलटण संस्थानात अनेक जैन धर्मीय बांधवही व्यापाराच्या निमित्ताने राहात होते. मालोजीरावांना जैन धर्मीयांच्या मध्ये असणारा अहिंसावाद मान्य होता म्हणूनच 11 एप्रिल 1938 ला पुढील महत्वाचा जाहीरनामा फलटण स्टेट गॅझेटमध्ये प्रकाशित केलेला दिसतो.

जाहिर विनंती--

मंळगवार 12 एप्रिल 1938 दिवस अहिंसा धर्माचा आद्यपुरस्कर्ता जैनधर्म संस्थापक महाविर यांच्या जयंतीचा दिवस असल्यामुळे सदरचा दिवस अहिंसा दिन दिवस म्हणून सर्वत्र पाळावा ,तरी सदर दिवशी संस्थानच्या हद्दीत पशूहत्या करण्यास बंदी करण्यात यावी"[21]

---

20 फलटण स्टेट गॅझेट 15 दि. 1936 - पृ.34

21 फलटण स्टेट गॅझेट 11 एप्रिल 1938- पृ. 18

वरील जाहीरनाम्यावरून एक गोष्ट लक्षात येते कि मालोजीराव हे जैन धर्मीच्या संस्थापाक्स किती आदर देत होते.

<u>दुसरे महायुध्द व फलटण संस्थान</u> --

1932 नंतर युरोपमध्ये हिटलर ,मुसोलीनीचा उदय झाला आणि सन 1938 ला दुस-या महायुध्दाचे ढग जमू लागले . 3 सप्टेबर 1939 ला हिटलरने पोलंडवर हल्ला केला आणि दुस-या जागतिक महायुध्दास सुरूवात झाली. भारत व भारतातील संस्थानिक त्यावेळी इंग्लंडचे नियंत्रणाखाली असल्याने या युध्दात इंग्रजांच्यावतीने भारतातील संस्थानिक राहिले. व्हॉयसरॉय, गव्हर्नर यांनी सर्व संस्थानिकांकडून आर्थिक ,लष्करी मदत मागीतली ती संस्थानिकांनी उत्स्फूर्तपणे दिलेली आहे.

फलटण संस्थान व इंग्रजी सत्ता यांचे तर संबंध पहिल्यापासूनच अतिशय मैत्रीचे असल्याने ह्या अडचणीच्या काळात भारत सरकारला 1939 ते 1945 या कालखंडामध्ये भरपूर आर्थिक मदत मालोजीरावांनी केलेली आहे तसेच युध्दात लढण्यासाठी माणसांची गरज होती त्यावेळी फलटण संस्थानातुन काही रिक्रुटही पुरवलेले आहेत. सन 1939 ते 1945 ह्या कालातील फलटण संस्थानचे प्रशासकिय अहवाल पाहिले असता फलटण संस्थानाने केलेली आर्थिक मदत सहज लक्षात येते.

3 सप्टेबर 1939 ला रविवार होता आणि त्याच दिवशी इंग्लंड आणि जर्मनी यांच्यात जागतिक महायुध्दास सुरूवात झाली. इंग्लडच्या सम्राटाचा जाहीरनामा भारतातील सर्व संस्थानिक व जनता यांच्यासाठी मध्यवर्ती कायदे मंडळात सिमला या ठिकाणी सोमवार दि.11 सप्टेबर 1939 ला व्हॉयसरॉयने वाचुन दाखविला. या खलित्यात भारतीय संस्थानिकांनी केलेले आजपर्यन्तच्या सहकार्याचा उल्लेख केलेला आहे ,तसेच या दुस-या जागतिक महायुध्दातसुध्दा सर्व संस्थानिकांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा केलेली आहे. त्या खलित्यातील महत्वाचा काही भाग खालीलप्रमाणे --

"In these days, when the whole of civilisation is threatened, the widespread attachment of India to the cause in which we have taken up arms had been a source of deep satisfaction to me. I also value most highly the many and generous offers of assistance made to me by the Princes and

People of India. I am confident that in the strugle upon which I and my peoples have now entered, we can count on sympathy and suport from every quarter of the Indian contient in the face of the common danger."[23]

वरील खलित्याची प्रत सर्व संस्थानिकांना पाठविलेली आहे. तशीच फलटण दरबारास मिळाली व 12 सप्टेंबर 1939 च्या फलटण संस्थानच्या गॅझेट मध्ये इंग्लडच्या राजाचा खलिता लोकांच्या माहितीसाठी प्रसिध्द केलेला आहे."[24]

फलटण संस्थानच्या दिवाणाने ब्रिटिश रेसिडेंटला तारेने उत्तर पाठविले आहे व सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे वचन दिलेले आहे. तसेच मालोजीरावांनी ब्रिटिश रेसिडेंटला पत्र पाठवून फलटण संस्थानातील सर्व जनताही इंग्लंडच्या बाजुने राहिल व संस्थानामार्फत सर्व आर्थिक व लष्करी सहाय्य पुरविले जाईल याची खात्री मी देतो.ते आपल्या पत्रात लिहितात --

" I most respectfully offer to place at the disposal of the crown all my humble resources should the necessity unfortunately arise. My State is no doubt a small one. But as I, have said above it is every body's duty to come forward to do one's utmost in such circumstances."[25]

तसेच 23 नोव्हेंबर 1939 ला रेसिडेंटला पत्र लिहून मालोजीरावांनी व्हॉयसरॉच्या नियोजित युध्द फंडास युध्द संपेपर्यन्त फलटण संस्थानामार्फत महिन्याला 1 हजार रूपयाची देणगी जाहीर केली"[26]

याशिवाय ह्या युध्दकाळात इतर अनेक देणग्या दिलेल्या आहेत, त्यातील महत्वाच्या देणग्या पुढीलप्रमाणे - 1939-1940 ला व्हॉयसरॉयच्या युध्द निधीसाठी रुपये 6000 दिलेले आहेत.

---

23 फलटण संस्थानाचा वार्षिक अहवाल सन 1939-40 - पृ.4

24 फलटण संस्थानचे गॅझेट दि.12 सप्टेंबर 1939

25 फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल - सन 1939-40 - पृ.-

26 कित्ता- पृ.5

1941–42 मध्ये व्हॉयसरॉयच्या युध्द निधीस 12 हजार रूपयाची देणगी दिलेली आहे."[27]

तर 1942–43 ला युध्दनिधीसाठी 12 हजार देणगी दिलेली आहे."[28]

तसेच 1943 ला फलटण संस्थानामार्फत महिन्याला युध्दनिधीसाठी 1000 रूपयाची देणगी दिलेली आहे. त्याच बरोबर 1944 अखेर वेगवेगळ्या मार्गाने 4 लाख रूपये फलटण संस्थानामार्फत युध्द निधीस दिलेले आहेत. पैकी 1 लाख रूपयाचे फलटण दरबाराने युध्द कर्जरोखे (**war Bonds**) विकत घेतलेले आहेत. यावरून फलटण संस्थानचे इंग्रजांना केलेले अर्थिक सहकार्य दिसून येते. तसेच संस्थानमार्फत अधिका–यांची भरती समिती नेमून 1943 ला संस्थानामार्फत 264 सैनिक नवीन भरती करून युध्दास पाठविलेले आहे."[29]

1945 ला जर्मनीचा पराभव झाला आणि दुस–या महायुध्दाचा शेवट झाला, इंग्लडच्या कठिण प्रसंगी भारतीय संस्थानिक त्यांच्या बाजूने राहून त्यांना सर्वतोपरी सहाय्य केले त्याचप्रमाणे मालोजीरावांने सुध्दा फलटण संस्थानामार्फत युध्द लढण्यासाठी सैनिक पुरविले व जवळ जवळ 6 लाख रूपयाचे आर्थिक सहाय्य दिलेले आहे.

<u>फलटण संस्थानास थोर लोकांच्या भेटी</u>––

फलटण संस्थानात मालोजीरावांच्या प्रयत्नामुळे व त्यांच्यावर असणा–या प्रेमामुळे त्या काळचे महर्षि कर्वे, डॉ. राधाकृष्णन, न. चि. केळकर, डॉ. बी. आर. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, इ. भेटी दिल्या होत्या. व त्यांनी मालोजीरावांच्या कार्याची प्रशंसा केली होती.

---

27 फलटण संस्थानाचा वार्षिक अहवाल सन 1941–42 – पृ. 4

28 फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल सन 1942–43– पृ.4

29 फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल सन – 1943–44 – पृ. 1–2.

<u>महर्षि धोंडो केशव कर्व्यांचा फलटण संस्थानात सत्कार---</u>

मालोजीराजे हे स्वतः समाज सुधारक होते तसेच इतर समाज सुधारकांना भरीव आर्थिक सहाय्य त्यांनी केलेले होते. भारतातील स्त्री-शिक्षणाचे उध्दारकर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध आलेला होता. महर्षि कर्वे सारखा समाज सुधारक आपल्या संस्थानात यावा संस्थानामार्फत सत्कार करावा यासाठी मालोजीरावाने त्यांना संस्थानामार्फत आमंत्रण दिलेले आहे व कर्वेंचा 82 वा वाढदिवस फलटण संस्थानात 19 एप्रिल 1939 ला साजरा करण्याचे ठरविले"[30]. कर्व्यांनी एस.एन.डी.टी. वुमेन्स युनिव्हर्सिटी काढलेली होती. विधवांच्यासाठी पुण्यात अनाथ बालीकाश्रम सुरू केला होता.या दोन्हीही संस्थेशी मालोजीराव त्यांच्या पत्नी लक्ष्मीदेवी यांचा जवळचा संबंध आलेला होता.

डॉ. आर.पी. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली कर्व्यांचा मोठा जाहीर सत्कार फलटण ला झाला. त्या वेळी थोर स्वातंत्र सैनिक व केसरीचे दिर्घकाळ असणारे संपादक न.चि. केळकर हे फलटण ला प्रमुख वक्ते म्हणून आले होते. फलटण म्युनिसिपालटी, फलटण संस्थान ,लोकल बोर्ड यांच्या मार्फत प्रो. कर्वे ,डॉ. परांजपे व न.चि. केळकर 19-4-1939 ला फलटण येथे मोठा समारंभ भरवून मानपत्र देण्यात आले. त्यांच्या सत्कारात मेजवानी पण आयोजित केलेली होती. कर्वेंना तर त्यांच्या ह्यातीपर्यन्त वार्षिक 600 रू. अनुदान फलटण संस्थानामार्फत जाहीर केले होते."[31]

तसेच मालोजीरावांनी आपल्या भाषणात कर्वे हे ह्या युगातील सर्वश्रेष्ठ समाजसुधारक आहेत असा उल्लेख केलेला आहे. त्यासंबंधी प्रशासकिय अहवालात खालील महत्वपूर्ण माहिती मिळते--

" Shrimant Raja Sahab then announced in his speech a grant of an annuity of Rs.600 to Prof. Karve in recognition of his great social and national service to Maharashtra and the country as a whole. He said that Prof. Karve was the greatest social reformer of his age, who had steadily followed his own convictions and that his achievements bespoke of his

---

30 फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल सन 1938-39 - पृ.7

31 कित्ता - पृ.7

undaunted courage and energy. He never knew rest."[32]

तसेच राणीसाहेबांनी कर्वे ना फाऊंटनपेन, सौ. कर्वे यांना सोन्याच्या बांगडया आपल्यावतीने दिल्या.

कर्व्यांच्या या भेटीचा वृत्तांत त्यावेळी अनेक वर्तमान पत्रातुन आला. कर्वे यांनी मालोजीरावांचा मुक्तकंठाने गौरव केला. या कार्यक्रमाची आठवण फलटण संस्थानचे दिर्घकालीन दिवाण गोडबोले खालीलप्रमाणे सांगतात, त्या आठवणीत मालोजीरावांच्या व कर्वे यांच्या भाषाणाचा काही भाग घेतलेला तो अभ्यासकांना महत्वाचा असल्याने येथे मी थोडक्यात देत आहे.

"महर्षि घोंडो केशव कर्वे उर्फ आण्णासाहेब कर्वे यांचा 82 वा वाढदिवस समारंभ व रँगलर डॉ. र. प. परांजपे व श्री न. चि. केळकर उर्फ तात्यासाहेब केळकर यांचे सत्कारसमारंभ ता. 19 एप्रिल 1939 रोजी फलटणास अपूर्व रीतीने साजरे करण्यात आले. यामुळे आम्ही 82 वा वाढदिवस साजरा करण्याचे ठरविले. श्रीमंतानी त्या संमारंभात केलेल्या भाषणात ही गोष्ट फार चांगली मांडली होती ते शब्द असे – वास्तविक अशा मोठ्या महात्म्याला येथे स्वतःच्या घरी आणून त्याचे स्वागत करण्याची इच्छा करणे यात विशेष असे काय आहे ? परंतु या साध्या गोष्टीने देखील पुष्कळांचे कुतुहल सकारण अगर निष्कारण जागृत झालेले आम्हाला आढळले, म्हणून मी या संबंधी थोडासा खुलासा करण्याची परवानगी घेतो. पुण्यात कर्व्यांचा 81 वा वाढदिवस साजरा झाला, त्यात आपला थोडासा हातभार लावणे हा मार्ग आम्हाला मोकळा होता परंतु पहिली गोष्ट म्हणजे तो मार्ग कर्व्यांच्या संबंधाने व त्यांच्या कार्यसंबंधाने आमची जी उत्कट व प्रेमाची भावना आहे. तिच्या दृष्टिने अत्यंत मामुली व विसंगत असा आम्हाला वाटला ,दुसरी व विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे आमचे आमच्या प्रजाजनांवर जे प्रेम आहे त्यादृष्टिने आम्ही जी जी चांगली गोष्ट करतो तीत आमच्या बरोबरीने भाग घेण्याची संधी त्यांना मिळावी अशी आमची इच्छा असते, आम्हाला वाटले कि, कर्व्यांना येथे आणले म्हणजे ते कोण व कशाप्रकारचे गृहस्थ आहेत ,त्यांचे जीवनकार्य कोणते व त्याकरता त्यांनी काय केले आहे या गोष्टी सहजच आमच्या संस्थानच्या लोकांना कळतील कारण आमच्या मते हे सर्व समजणे हेच एक प्रकारचे अप्रत्यक्षपणे मोठे

---

32 कित्ता– पृ. 7

शिक्षण आहे. त्यायोगे विचारांची प्रगति होते. शिवाय कर्व्यांच्या कार्यविषयीही सहानुभूति व आस्था उत्पन्न होतात. परंतु या व्यवहारिक फायद्याखेरीज कर्व्यांसारख्या महात्म्याच्या दर्शनाने लोकांचा एक प्रकारचा आत्मिक फायदाही होतो अशी आमची समजूत आहे. अंतःकरणाची भुक व भावना या प्रत्यक्ष दर्शनाने जशा तृप्त व संतुष्ट होतात तशा त्या वर्णने ऐकून होत नाहीत" [33]. . . . . . .

पण कर्व्यांना येथे बोलवण्यात आणखी एक हेतू होता, तो असा कि त्यांच्या कार्याला आमच्याकडून आजवर अल्पस्वरूप मदत झाली आहे ती किती सत्पात्री झाली आहे हेहि आमच्या लोकांच्या लक्षात यावे व त्या योगे त्यांना संतोष व्हावा, हीच संधी साधून डॉ.र.पु. परांजपे व श्री न.चि. केळकर यांनाही मानपत्रे देऊन सन्मान करण्यात आले ,तसेच कै. डॉ. मा.त्र्य. पटवर्धन उर्फ कवी माधव जुलीयन यांना मराठीची ( डी.लीट.) पदवी मिळाली म्हणून त्यांचाही सन्मान करण्यात आला. हे समारंभ एकाच वेळी झाले असले तरी या सर्वच व्यक्ती फार मोठया होत्या हे विसरून चालणार नाही, त्यावेळच्या आपल्या भाषणात प्रा.कविवर्य शं.के. कानेटकर उर्फ गिरीश यांनी हा मुद्दा फार चांगला मांडला होता.

ते म्हणाले " आजच्या या समारंभाला अपूर्व वैभव प्राप्त झाले आहे. विद्वानांचे राजांनी केलेले हे कौतूक अभुतपूर्व होय. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानातील यासंबंधाचा इतिहास लिहिला गेल्यास त्यात आजचा हा प्रसंग सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल ,उत्तम आदर्श व प्रत्यक्ष कृति जनतेपुढे ठेवाव्यात व त्यामुळे प्रजाजनांना ज्ञानाचा लाभ करून द्यावा हे श्रीमंत राजेसाहेबांचे ध्येय आहे. या समारंभाने श्रीमंतांनी जनतेपुढे तीन उच्च आदर्श ठेविले आहेत .

हे समारंभ वैशिष्टयपूर्ण करण्यासाठी कांही विशेष गोष्टी योजिल्या होत्या, त्यातली एक अशी की फलटण संस्थानातील 80 वर्षे वयाच्या सर्व स्त्री–पुरूषांना महर्षि अण्णासाहेबांच्या हस्ते प्रत्येकी एक मोठे चांदीचे भांडे ( त्यावर ज्या प्रसंगानिमित्त दिले तो त्याला दिले त्याचे अगर तिचे नाव कोरून) देणगी दाखल देण्यात आले. अशा स्त्री–पुरूषांची संख्या 51 (38 पुरूष व 11 स्त्रिया ) भरली, त्यावेळीची फलटण संस्थानची लोकसंख्या 58,761 एवढी होती.

---

33 श्री मालोजीराव सत्कार समारंभ अंक दिवाण गोडबोले यांचा लेख – पृ.14–15

"महर्षि अण्णासाहेब कर्वे म्हणाले की , गेल्या वर्षापासून माझे अनेक सत्कार झाले परंतु आजच्या समारंभाने माझ्या मानावर जे चित्र उमटले आहे तसे दुसऱ्या कोणत्याही समारंभाने उमटले नाही, हे मी प्रामाणिकपणाने सांगतो खरोखर आज येथे जमला आहे अशा प्रकारचा समाज व श्रोतृवर्ग मिळणे फार कठीण आहे. आज या प्रसंगी श्रीमंत राजेसाहेब व श्रीमंत सौ.राणीसाहेब यांचे आभार कसे मानावेत तेच मला समजत नाही. मला शब्दच सापडत नाहीत, श्रीमंत राजेसाहेबांनी आज मला असे काही देण्याचे योजिले असेल अशी गोष्ट माझ्या स्वप्नात देखील नव्हती व आली नसती, श्रीमंतांनी मला सालीना रू.600– पेन्शन देण्याचे ठरविले असून त्यापैकी पहिला चेक मी खिशांतही घातला आहे".[34]

<u>डॉ.एस्.राधाकृष्ण यांची फलटण संस्थानास भेट</u>– ( 1941 )––

भारताचे थोर सुपुत्र आंतरराष्ट्रिय किर्तीचे शिक्षणतज्ञ ,थोर विचारवंत पुढे भारताचे उपराष्ट्रपति व राष्ट्रपति झालेले डॉ. राधाकृष्णन यांनी पण फलटण संस्थानला सन 1941 ला भेट दिलेली दिसते. त्यावरून मालोजीराजे हे किती श्रेष्ठ व गुणीजनांचे चाहते होते याची कल्पना येते.

डॉ.राधाकृष्णन यांना फलटणात आणून त्यांचा योग्य तो सत्कार मालोजीराजांनी घडवून आणलेला आहे. त्यासंबंधी फलटण संस्थानाच्या दि.15 ऑगस्ट 1941 गॅझेटमध्ये खालील मजकुर प्रसिध्द झालेला आहे.

"डॉ. सर एस. राधाकृष्णन यांची भेट– डॉ. सर सर्वपल्ली राधाकृष्णन एम.ए,डी.लीट., ,एलएल.बी., व्हॉईस चॅन्सलेर, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी यांनी 28 जुलै 1941 या दिवशी फलटण संस्थानास भेट दिली ,त्यावेळी त्यांना मानपत्र देण्यात आले."[35]

ह्या वरून फलटण संस्थानला किती मोठमोठ्या लोकांनी भेटी दिल्या व त्यांना जवळून पाहणे व त्यांचे विचार ऐकणे हे फलटण सारख्या लहानश्या प्रजाजनांना केवळ मालोजीरावांच्यामुळे शक्य झाले,यातच त्यांचा मोठेपणाचा गुण दिसून येतो.

---

34 कित्ता– पृ.14

35 फलटण संस्थानचे गॅझेट दि.15 ऑगस्ट 1941– पृ.28

कर्मवीर भाऊराव पाटील व मालोजीराव--

आधुनिक महाराष्ट्रातील बहुजन समाजातील थोर शिक्षणतज्ञ व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यास प्रथम पासूनच मालोजीराव यांचा आधार होता. अण्णांच्या अडचणीच्या वेळी मालोजीराव यांनी आर्थिक सहाय्य तर केलेलेच आहे तर त्याच बरोबर आपला बंगला व जमीन रयत शिक्षण संस्थेस कशी दिली हे कर्मवीर अण्णा यांच्या भाषेत ऐकणे योग्य होईल ,कर्मवीर अण्णाने " रयत सेवक मालोजीराव" लेख लिहिला आहे त्यात ते खालील मालोजीरावा सबंधी माहिती देत आहेत--

"फलटण हे महाराष्ट्रात सगळयांत जुने संस्थान आहे.ते महाराष्ट्रात फलटण चौ-याऐंशी म्हणून प्रसिध्द आहे. श्री मालोजीराव हे बोलके समाज सुधारक नसुन कृतिशील समाज सुधारक आहेत. त्यांच्या ठिकाणी जातीधर्मादि भेदाभेद नाहीत,त्यांच्या संस्थानांत ब्राम्हण व गुजराथी समाजांना चांगली प्रगति करून घेता आली. निव्वळ बहुजन समाजासाठी म्हणून त्यांनी खास असे काही केले नाही .सर्वाकडे समदृष्टिने पाहिल्यामुळे बहुजन समाज,जो समाजाचा खालचा थर,त्याची फारशी उन्नति झाली नाही, तथापि अलीकडील काही वर्षात फलटणच्या हायस्कुलमध्ये ब-याच सवलती ठेवल्यामुळे बहुजन समाजातील काही विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले आहे, माझ्या संस्थेसाठी आपला सातारा येथील बंगला व साडेदहा एकर जमीन आणि त्या बरोबर 5 हजार रूपयांची देणगी आपणाहुन दिली( ) हे त्यांचे औदार्य मला कधीही विसरता येणार नाही,ते आमचे संस्थेचे पहिलेच आश्रयदाते होत. त्यांचे व माझे वैयक्तिक अथवा राजकिय मतभेद असल्यामुळे मी त्यांच्यावर अनेक वेळा टिका केली असे असूनही त्यांनी माझ्यावर व माझ्या संस्थेवर पहिल्या इतकेच प्रेम कायम ठेविले आहे."[36]

अण्णांचे सुपुत्र व रयतशिक्षण संस्थेचे संघटक आप्पासाहेब पाटील कर्मवीर व मालोजीराव यांचे संबंध कसे जिव्हाळयाचे होते यासंबंधी पुढील माहिती देतात --

"कर्मवीर आण्णांचे कार्य विशेषकरून खेडयांपाडयांतील गोरगरीब जनतेच्या मुलांना अल्प खर्चात व विशेषकरून स्वावलंबी तत्वावर शिक्षण देण्याचे असल्याने त्यांना फार फिरावे लागे, कर्मवीर अण्णांचे शरीर स्थुल असल्याने श्रीमंत मालोजीराजांनी कर्मवीर आण्णांना स्वतःची गाडी ड्रायव्हरसहित

------------------

36 श्री मालोजीराव सत्कार अंक-कर्मवीर पाटलांचे लेख - पृ.32

वापरास दिली. आणि ही गाडी तुम्ही सतत वापरीत जा, महाराष्ट्राला तुमची गरज आहे. तुमचे स्वास्थ पाहणे आमचे कर्तव्य आहे, बंधु या नात्याने आपण माझी विनंती मान्य करा" अशी महाराजांनी आण्णांना कळकळीची विनंती केली. तेव्हा आण्णांनी ती गाडी काही दिवस वापरली व प्रकृती बरी होताच ती गाडी महाराजांना परत केली, पुढे मालोजीराव कॉंग्रेस पक्षात सामील होऊन मुंबई राज्याचे बांधकाम मंत्री झाले .कर्मवीर आण्णांनी देवापुर तालुका माण जिल्हा सातारा येथील राजेवाडी तलावाकाठची शे–सव्वासे एकर सरकारी जमीन "कमवा व शिका" या योजनेसाठी शासनाकडे मागितली,ही जमीन महाराजांनी पुढाकार घेऊन कर्मवीरांना दिली व या जमिनीचा योग्य तो वापर संस्था आजतगायत करीत आहे. पुढे कर्मवीरांचे व महाराजांचे संबंध घरोब्याचे झाले. फलटण जवळील लोणंद येथील आमच्या संस्थेच्या विद्यालयास महाराजांचे नाव देऊन आण्णांनी त्यांचे कायमचे स्मारक केले."[37]

"कर्मवीरांच्या निधनानंतर त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी ते आवर्जुन उपस्थित राहिले . आण्णांच्या निधनाने हताश झालेल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांना त्यांनी दिलासा देऊन आण्णांचे कार्य पुढे नेटाने चालू ठेवण्याचे आवाहन केले. अशारीतीने संस्थेच्या उभारणीत महाराजांचा फार मोठा ,हिस्सा आहे."

<u>मालोजीराव व सातारा विद्याप्रसारक समाज</u>--

रयत शिक्षण संस्थेप्रमाणे साता–यातील दुस–या एक शैक्षणिक संस्थेस मालोजीरावांनी जमीन दिली होती,सन 1939 ला <u>"सातारा परडा"</u> नावाची त्यांची स्वत:ची जमीन 2 एकर 25 गुंठे जमीन सर्व्हे नं.10/1 ही त्या संस्थेस 99 वर्षाच्या लिजने मालोजीरावांनी ती दिलेली आहे." [38]

तसेच 9 डिसेंबर 1939 ला मालोजीराव सातारा येथे भरलेल्या " अखिल महाराष्ट्र शारिरीक शिक्षण " परिषदेस हजर राहिले,त्या परिषदेचे अध्यक्ष होते ,बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड , सयाजीराव गायकवाडांचा दौरा सातारा शहरात होता व त्या दिवशी त्यांचे भरगच्च कार्यक्रम होते. त्या सर्व कार्यक्रमास मालोजीराव सयाजीराव गायकवाडांच्या बरोबर हजर राहिले. सयाजीरावांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्या श्री महाराजा सयाजीराव हायस्कुल व ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा पाया भरणी समारंभ

---

37 स्मरणिका पुतळा स्मारक समिती जानेवारी 1983– आप्पासाहेब पाटील यांचा लेख – पृ.12

38 फलटण संस्थानचा प्रशा. अहवाल सन १९३९-४० पृ.८

झाला, त्यावेळी मालोजीरावांनी प्रास्ताविक भाषण केलेले होते, तसेच 4 डिसेंबर 1939 ला सातारा मराठा विद्या प्रसारक समाज यांनी चालवलेल्या "श्री महाराणी जमनाबाई मराठा बोर्डींग सातारा या इमारतीचाही पाया भरणी समारंभ सयाजीरावांच्या हस्ते झाला त्यावेळी मालोजीराव हजर होते."[39]

## म्हैसूर व कोल्हापूर महाराजांना श्रध्दांजली--

मालोजीराव हे स्वतः एका ऐतिहासिक घराण्यातील राजपुरूष तर होतेच परंतु ते सामाजिक समतेचे पुरस्कर्तेपण होते. त्यांनी आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षण ,अस्पृश्यता निवारण, हरीजन विद्यार्थांना सवलती इ. कार्ये केलेले होते. भारतात त्यावेळी म्हैसूर संस्थान प्रागतिक संस्थान म्हणून ओळखले जात होते कारण तेथे राज्य करणा-या कृष्णराज वाडियार हे कोल्हापूरच्या शाहूमहारांजा प्रमाणे थोर समाज सुधारक होते. कृष्णराज वाडियार यांनी आपल्या ह्यातीत अनेक सामाजिक आर्थिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या होत्या, याची माहिती मालोजीराजांना होती. कृष्णराज वाडियार यांचे निधन 4 ऑगस्ट 1940 ला झाले आणि त्यांच्या निधनानिमित्त 5 ऑगस्ट 1940 ला मालोजीरांनी फलटण संस्थानातील सर्व कार्यालये शाळा यांना एक दिवसाची सुट्टी जाहीर केली"[40] ह्या वरून मालोजीराव हे कृष्णराज वाडियारवर किती प्रेम करीत होते हे दिसून येते.

तसेच 27 नोव्हेंबर 1940 ला कोल्हापूर चे छ. राजाराम महाराज यांचे दुःखद निधन झाले. कोल्हापूरची गादी ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशाची गादी होती मालोजीरावांना छत्रपतींच्या गादीविषयी व कोल्हापूर घराण्याविषयी आदर होता. तसेच विद्यार्थी दक्षेत कोल्हापूरला असताना त्यांनी शाहू महाराजांनी केलेले सामाजिक कार्ये जवळून पाहीले होते. शाहू महाराजांच्या निधनानंतर ( 1922) 1940 पर्यन्त राजाराम महाराज यांनी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य पुढे नेले होते अशा या शाहूपुत्र राजाराम महाराजांचे निधन झाले ही दुखःदायक घटना फलटण संस्थानात समजली ,त्यांच्या निधनाप्रित्यर्थ 4 व 28 नोव्हेंबर 1940 ला फलटण संस्थानामधील सर्व शाळा व कार्यालये बंद ठेवण्याचा हुकूम काढण्यात आले."[41]

---

३९. फलटण संस्थानचे अहवाल सन १९३८-४० पृ. ८

40 फलटण संस्थानचे अहवाल – सन 1940–41 – पृ.4

41 फलटण संस्थानचा प्रशा.अहवाल – सन 1940–41 –पृ.4

<u>भारत इतिहास संशोधन मंडळ व मालोजीराव</u>–

इ.स. 1910 ला भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी पुण्यात केली. मालोजीराव हे इतिहासाचे गाढे अभ्यासक होते म्हणून प्रथम पासूनच या संस्थेशी जवळचा संबंध असलेला होता त्यांनी आर्थिक अनुदान दिलेले होते तसेच आपल्या संस्थानातील काही कागदपत्रे या मंडळाला पुरविलेली दिसतात. कांही वर्षे ते भारत इतिहास संशोधन मंडळ चे अध्यक्ष होते. 20 एप्रिल 1946 च्या फलटण संस्थानच्या गॅझेटमध्ये खालील महत्वाची माहिती दिसते––

"कै.दत्तोपंत आपटे यांच्या द्वितीय स्मृति दिनानिमित्त दि.2–11–45 रोजी श्रीमंत सरकार साहेब संस्थान फलटण यांनी भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये केलेले अध्यक्षीय भाषण महत्वाचे होते. श्रीमंत सरकार भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष होते."[42]

<u>हरीजनांना मंदीर प्रवेशाचा अधिकार</u>––

मालोजीरावांचे शैक्षणिक कार्याप्रमाणेच सामाजिक कार्य मोठे दिसते. त्यांनी आपल्या संस्थानात सर्व हरीजनबांधवांना श्रीराम,दत्त मंदिर खुले करण्याचा आदेश देऊन एक सामाजिक क्रांती घडवून आणलेली दिसते. त्यांचा हा आदेश 2 ऑक्टोबर 1947 च्या फलटण गॅझेटमध्ये प्रसिध्द झालेला तो मी देत आहे.

"श्रीमंत सरकार मालोजीराव नानासाहेब नाईक निंबाळकर संस्थान फलटण यांचे हूजूरातून जाहिरनामा–––

सर्व लोकास कळविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येते की फलटण येथे श्रीराम ,श्री दत्त , ,श्री नागेश्वर मंदीर सरकार खाजगी मालकीची आहे. या मंदिरात हरीजनांनी जाण्याचा आजवर प्रघात नव्हता, त्यामुळे हरीजन लोकांना मंदीरात जाता येत नव्हते. अस्पृष्यता नष्ट व्हावी असे आमचे मत असल्याने अनेकवार जाहीररित्या आम्ही स्पष्ट बोलून दाखविले आहे, गेल्या 20 वर्षात त्याबाबत आम्ही प्रयत्न केले आहे ,त्यास अनुसरून वरील मंदीरात हरीजनांना प्रवेश करण्यास मोकळीक आहे.

---

42 फलटण संस्थानचे गॅझेट सन 20 एप्रिल 1946– पृ. 2

सदर मंदिर 2 माहे ऑक्टोबर 1947 रोजी महात्मा गांधीजीच्या जन्म दिवसापासून खुली करण्यात येत आहे असे आम्ही जाहीर करतो."[43]

आश्रयदाते मालोजीराव---

मालोजीराव महाराज हे स्वतः ज्ञानी अभ्यासू विद्वान असल्यामुळे त्यांनी आपल्या ह्यातीत अनेक संस्था, व्यक्ती, लेखक इ. आर्थिक मदत दिलेली आहे. त्यावरून त्यांचे कोणकोणत्या संस्थेशी जवळचे संबंध होते हे दिसून येते. सन 1943-44 च्या फलटण संस्थानच्या वार्षिक अहवालात एक सविस्तर यादी दिलेली आहे. त्यावरून त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती समजण्यास मदत होती म्हणून मी ती देत आहे --

| | संस्था | रक्कम |
|---|---|---|
| 1 | युध्द निधी | 12120- |
| 2 | शैक्षणिकव सांस्कृतिक उद्देश | |
| | वारकरी शिक्षण संस्था आळंदी | 501- |
| | वैदीक शिक्षण मंडळ | 300- |
| | प्राव्हेट इंग्लीश स्कुल कोल्हापूर | 300- |
| | श्री एस.आर.शिन्दे संशोधन कार्यासाठी | 250- |
| | भांडारकर सिसर्च संस्था, पुणे | 500- |
| | सतकार्य उत्तेजेक सभा | 1000- |
| | शारीरिक शिक्षण मंडळ ,मुंबई | 50- |
| 1 | मराठी स्टेज सेंच्युरी सेलेब्रेशन | 300 |
| 2 | दख्खन व्हर्नाक्युलर सोयायटी | 250 |
| 3 | कर्वे यांची पेन्शान | 600 |
| 4 | दख्खन असो., पुणा | 120 |
| 1 | मुख्यध्यापक म्युनिशिपल स्कुल सातारा | 40 |
| 3 | लेखकांचे आश्रयदाते | |
| | 1.प्रो.डी.डी.वाडकेर | 200 |

43 फलटण गॅझेट सन 2 ऑक्टो., 1947- पृ.3

| | संस्था | रक्कम |
|---|---|---|
| | 2.महर्षि दिवेकर | 100 |
| | 3.एस.ए.अमीन | 50 |
| | 4.एस.एल.गोखले | 100 |
| | 5.श्री एस.बी.पाटील | 50 |
| | 6.प्रो.एन.अे.गोरे त्यांनी लिहिलेल्या रामांणाच्या 20 कॉपी खरेदी करण्यासाठी. | 24 |
| | 7. पंडीत रघुनाथ शास्त्री पटवर्धन यांनी लिहलेल्या पुस्तकांसाठी ज्योतिष तत्वदर्शन. | 200 |
| 4 | सार्वजनिक संस्थेला आश्रय -- | |
| | 1.पी.वाय. सी.हिंदु जिमखाना,पुणा | 500 |
| | 2.हिंगणे येथील अंध मुलांच्यासाठी इमारत बांधण्यासाठी | 1100 |
| | 3.माधवराव पटवर्धन स्मारक समिती | 3000 |
| | 4.महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ,पुणा | 2000 |
| | 5.डेव्हीड ससुन आभ्य गृह | 500 |
| | 6.मुधोजी क्लब फलटण | 400 |
| | 7.व्हिक्टोरीया डायमंड ज्युबिली लायब्ररी फलटण | 250 |
| | 8.लेडीज क्लब | 57 |
| 4 | इतर देणग्या | |
| | 1.विजापूर दुष्काळ फंड | 1000 |
| | 2.बंगाल फिमेन फंड | 1000 |
| | 3.सत्यवादी कोल्हापूर | 250 |
| | 4.जागृती पाक्षिक बडोदा | 200 |
| | 5.नरेंद्र मंडळाचे अध्यक्ष बिकानेरचे महाराज यांचा दिल्लीत अर्धपुतळा उभारण्यासाठी | 50 |
| | 6.ऑल इंडिया कॅटल शो इंडिया | 100 [44] |

---

44 फलटण संस्थानाचा वार्षिक अहवाल सन 1943-44 पृ.4-5

<u>मालोजीरावांचे कौटोंबिक जीवन</u>---

मालोजीराव यांचे कौटुंबिक जीवनसुध्दा समाधानकारक होते. फलटण संस्थानच्या प्रशासकीय अहवालाप्रमाणे ते फलटण संस्थानचे 25 व्ये अधिपती होत. ब्रिटिश सरकारने त्यांना 1 जानेवारी 1936 पासून "राजा" हा किताब दिलेला आहे. तर दुस-या महायुध्दात त्यांनी केलेले सहकार्य लक्षात घेऊन 1942 ला त्याना ब्रिटिश सम्राटाने के.सी.आय.ई.(K.C.I.E.) हा मानाचा किताब दिलेला आहे."[45]

मालोजीराव यांचा विवाह लक्ष्मीदेवी यांच्याशी सन 18-12-1913 रोजी झाला होता. लक्ष्मीदेवींचा जन्म 17-11-1901 तर मालोजीरावांचा जन्म 11 सप्टेंबर 1896 चा होता. ह्या दोघांना एक मुलगी व चार मुलगे होते"[46] त्यांची नावे व जन्म तारखा पुढीलप्रमाणे --

| | | |
|---|---|---|
| 1 | श्रीमंत सरोजनीदेवी उर्फ आक्कासाहेब | 2-6-1920 |
| 2 | श्रीमंत युवराज प्रतापसिंह उर्फ बापूसाहेब | 13-7-1923 |
| 3 | श्रीमंत विजयसिंह उर्फ शिवाजीराजे | 15-5-1925 |
| 4 | श्रीमंत उदयसिंह राजे | 7-12-1927 |
| 5 | श्रीमंत विक्रमसिंहराजे | 13-12-1933 |

सर्व राजपुत्रांचे व राजकुमारीचे शिक्षण योग्य प्रकारे होऊन आज देखिल सर्वजन शैक्षणिक ,राजकिय , सामाजिक कार्ये करीत आहेत व महाराष्ट्राची व फलटण तालुक्याची सेवा करीत आहेत. याच ऐतिहासकि घराण्यातील मालोजीराजांचे वारस श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर ,फलटण तालुक्याचे आमदार आहेत. (1995 पासून ) तर दुसरे त्यांचे नातू श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर हे फलटण तालुक्याचे सभापति आहेत. तर तिसरे नातू श्रीमंत रघुनाथराजे हे फलटण नगरपालीकेचे शिक्षण समितीचे सभापति आहेत. तर मालोजीचे सुपूत्र श्रीमंत शिवाजीराजे हे माजी आमदार असून सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली फलटण एज्युकेशन सोयायटीची गरूड भरारी चालूच आहे.धन्य ते मालोजीराजे ,धन्य ते नाईक निंबाळकर घराणे.

---

45 फलटण संस्थानाचा वार्षिक अहवाल -सन 1943-44 - पृ.2

46 कित्ता - पृ.2

1942 चा फलटण संस्थानचा कायदा –( 1942 )
**( PHALTAN STATE ACT 1942 )**

मालोजीराव हे हूकुमशाहीवृत्तीने राज्यकारभार करणारे संस्थानिक नव्हते. त्यांना बदलत्या परिस्थितिची जाण चांगली होती. जगामध्ये आज ना उद्या राजेशाहीचा शेवट होऊन लोकशाही राज्यकारभार भारतात सुध्दा येणार हे त्यांनी ओळखले होते म्हणूनच 1929 सालापासून फलटण संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीचा स्विकार त्यांनी आनंदाने केलेला होता. सन 1925 पासून 1942 पर्यन्त अनेक सवलती देऊन फलटण लोकसभा ,लोकलबोर्ड ,फलटण नगरपालिका या संस्थेतुन लोकशाहीमार्गाने निवडून आलेल्या सदस्यांना त्यांनी स्थान दिलेले होते. सन 1942 चा फलटण संस्थान कायदे मंडळाचा कायदा हा महत्वाचा होता "[47] कायदे मंडळात एकूण 18 सदस्य असून त्या पैकी 12 प्रतिनिधी प्रजेमार्फत निवडलेले असत तर 6 सदस्य सरकारमार्फत नियुक्त केलेले असत. लोक नियुक्त 12 सदस्यांमधून दोन मंत्रीही नेमलेले होते. यावरून त्यांनी लोकांना आपल्या राज्यकारभारात योग्य प्रतिनिधित्व दिले होते हे निश्चितच अशा रीतीने फलटण संस्थानात लोकसभा नावाची संस्था स्थापन झाली . लोकसभेने त्यावेळी काही संस्थानातील प्रजेच्या हिताच्या गोष्टीही हाताळल्या , विशेषतः साडेतीन आणे सारासुट ही प्रामुख्याची लोकहिताची तशीच महत्वाची बाब होती पण त्या प्रसंगी ज्या वाटाघाटी दरबार व लोकसभेमध्ये पुढारी यांच्या झाल्या त्यात शेवटी राजेसाहेबांनी मुळ मागणीपेक्षा थोडे अधिकच दिले यावरून त्यांचे प्रजेसंबंधीचे प्रेम व्यक्त होत होते "[48]

पुढे शेकतरी संघाचे प्रतिनिधी बहुमताने कायदे मंडळात आले, त्यांनी स्थानिक संस्था,शाळा, लोकल बोर्डा सारख्या संस्थेत लोकहित पाहू लागल्याचे दिसू लागल्यामुळे काही काळ त्यांचे कार्यक्षेत्र या संस्थानात वाढले . संस्थानाच्या बाहेरील ब्रिटिश प्रांतात काँग्रेसची चळवळ जोरात सुरू होती, तसेच संस्थानी मुलखात प्रजापरिषदांमार्फत लोकांच्या मागण्याचा पाठपुरावा होऊ लागला त्याचे पडसाद येथे उमटले आणि तेथे प्रजापरिषद नावांची संस्था स्थापन झाली" [49]

---

47 फलटण संस्थानाचे गॅझेट सन 1942

48 श्री मालोजीराव सत्कार अंक 1957 – रा.ब.भगत यांचा लेख – पृ. 71

49 कित्ता–

सन 1942 मध्ये फलटण संस्थानात लोकपक्षीय मंत्री श्री.स.रा.भोसले यांच्या हाती काही खाती देण्यात येऊन तेथे द्विदल राज्यपध्दतीस आरंभ करण्यात आला व पुढे एक वर्षाने जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याचा कायदा जारी करण्यात येऊन दुसरा मंत्री घेण्याचे जाहीर झाले. आपल्या प्रजेला जास्त अधिकार देण्यात फलटण अधिशांचा नंबर दुसरा लागतो (पहिला नंबर औंध नृपतिंचा)"[50]

<u>प्रजापरिषदव फलटण संस्थान</u>--

ब्रिटिश भारतात लोकांची गा-हाणी मांडण्याचे काम व लोकांच्या हक्कासाठी झगडण्याची जबाबदारी अखिल भारतीय काँग्रेस पक्षानी घेतली होती तर संस्थानामध्ये जनतेस हक्क मिळवून देण्याचे कार्य प्रजापरिषदेने वेगवेगळया संस्थानात केलेले आहे. ब-याच वेळा काँगेसचे नेते हेच काही प्रजापरिषदेच्या नेत्यांना मार्गदर्शन करीत असत म्हणून प्रजापरिषद ही काँग्रेसची सिस्टर इन्स्टयुटूट म्हटले तर वावगे ठरणार नाही.

दक्षिण महाराष्ट्रातील 18 संस्थानापैकी फलटण व सावंतवाडी ही दोन संस्थाने पुरोगामी वाटतात कारण तेथे प्रजापरिषदेची स्थापना थोडया उशिरा झालेली आहे. फलटण संस्थानमध्ये प्रजापरिषदेची स्थापना श्री गोविंदराव कजबुर यांच्या सांगण्यावरून इ.स.1944 मध्ये करण्यात आली. प्रजापरिषदेचे अध्यक्ष देशभक्त श.शंकरराव देव, कार्याध्यक्ष डॉ. दतात्रय मनोहर बर्वे व सरचिटणीस श्री.रा.ब. भगत होते. त्यावरून फलटण संस्थान प्रजापरिषद इ.स. 1944 च्या उत्तरार्धात स्थापन झाली असावी असे अनुमान काढता येते." [51]

फलटण संस्थानामध्ये प्रजापरिषदेची स्थापना थोडी उशिरा झाली याची माहिती वि.अ.पटवर्धन यांनी खालील प्रमाणे दिली आहे--

"फलटण व सावंतवाडी संस्थानातील कारभार हा प्रजाहितैषी असल्याने तेथे राजकिय चळचळीची गरज भासलीच नव्हती, आपल्या प्रजेची मागणी नसताना फलटण अधिपतीनी 1929 मध्ये विधी मंडळाची स्थापना करून व संस्थानच्या शासन मंडळात स्थानिक व वकिल श्री दाणी यांचा अंतर्भाव करून लोकपक्षीय मंत्री घेण्यात फलटणने आघाडी मारली. " [52]

---

50 वि.अ.पटवर्धन - द महाराष्ट्रातील सं.विलीनीकरणाची कथा- पृ.20

51 डॉ.अ.रा.भोसले यांचा फलटण संस्थानातील प्रजा पक्षीय चळवळ भाग-2 भारतीय इतिहास आणि सं.मै.वार्षिक - पृ.19

52 वि.अ.पटवर्धन द.महाराष्ट्रातील सं.विलीनीकरणाच्या कथा - पृ.8

परंतु नंतर मतभेदामुळे श्री स.रा.भोसले अर्थमंत्री यांची बडतर्फी व शिक्षण मंत्री शहा यांच्या राजीनाम्यामुळे काही काळ प्रजापरिषद व फलटण संस्थान प्रशासन यांच्यात संघर्ष निर्माण झाला व वातावरण तणावपूर्व होते.

फलटण प्रजापरिषदेचे अधिवेशन (1945 )--

फलटण संस्थान प्रजापरिषदेचे पहिले आणि शेवटचे अधिवेशन दिनांक 17-18 नोंव्हेबर 1945 रोजी फलटण येथे झाले. काँग्रेसचे सुप्रसिध्द नेते दे.भ.शंकरराव देव या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. हे अधिवेशन म्हणजे फलटणच्या जनतेने एकत्र येउुन आपल्या संस्थानातील घडामोडींची दखल घेण्याचा महत्वाचा प्रसंग होता. सदर अधिवेशनास स्थानीक राजकिय पक्षांचे पुढारी व नागरीक मोठ्या संख्येने हजर होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. रामचंद्र यशवंतराव मोईटे यांनी आपल्या स्वागतपर भाषणात संस्थानातील राजकिय परिस्थितिचा आढावा घेऊन संस्थानातील सर्व राजकिय पक्षांना प्रजापरिषदेत सामील होण्याचे आवाहन केले. फलटण संस्थान प्रजापरिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांचा फलटण नगरपालीकेमार्फत नागरी सत्कार करण्यात येऊन त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थानिकांचे कर्तव्य व जबाबदारीचा उहापोह केला. प्रजापरिषदेच्या अधिवेशनात सात महत्वाचे ठराव पास करण्यात आले"[53] प्रजापरिषदेचे अध्यक्ष ,पाहुणे, अधिकारी व प्रतिष्ठित नागरिक यांना अधिवेशन समाप्ती नंतर रात्री राजेसाहेबांनी मेजवानी दिली.

फलटण संस्थानची विलीनिकरण प्रक्रिया ---

सन 1935 च्या राज्यघटनेप्रमाणे हिंदी संघराज्याची जी घटना व्हावयाची होती, तिच्यांत सामील होण्याची मोकळीक संस्थानिकांना ठेवण्यात आली होती. पुढे सन 1939 मध्ये लूधियाना येथे पं.जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अधिवेशन झाल्यावेळी छोटया संस्थानांचे अस्तित्व ,त्यांनी आपापले गट केले तरच राहणार आहे असा ठराव पास करण्यात आला होता.

सन 1942 पासून आंतरराष्ट्रिय घडामोडीना प्रचंड वेग आला .म.गांधीनी सन 1942 ची

---

53 डॉ. अ.रा.भोसले उपनिर्दिष्ट लेख - पृ.20 व वि.अ. पटवर्धन - पृ.114

चलेजाव चळवळ पुकारली. सन 1945 ला दुस–या महायुध्दात इंग्लड जरी विजय झाले असले तरी त्याची आर्थिक व लष्करी ताकद कमी झालेली होती. ब्रिटिश पंतप्रधान ॲटली याने आपण लवकरच भारताला स्वातंत्र्य देऊ असे जाहीर केले होते. तसेच संस्थानात प्रजापरिषदेच्या चळवळीने जोर घरला होता. या सर्व घटनांचा परिणाम सर्व संस्थानिकावर झालेला होता. त्यांनी आपली संस्थाने राहणार नाहीत हे जाणले होते. महाराष्ट्रातील 18 संस्थाने तर उत्पन्न व आकाराने लहान होते. कॉंग्रेसच्या नेतृत्वाच्या आदेशानुसार लहान संस्थानिकांनी एकत्र येऊन दक्षिण संस्थान संघराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न केला"[54]

संस्थानाचे संघराज्य करावयाचे कि विलीनीकरण करावयाचे यासंबंधी चर्चा सुरू झाली. मालोजीराजे यांनी नेहरू पटेलांना संघराज्य स्थापनेविषयी सल्ला विचारला तेव्हा नेहरूंनी संघराज्याच्या योजनेस विरोध केला नसला तरी संस्थानिकांनी प्रजेच्या संमतीशिवाय व इच्छे विरूध्द संघराज्य स्थापन न करण्याचा सल्ला दिला.

सन 1946 च्या अखेरीस दक्षिणी संस्थानांचे संघराज्य होणार कि विलीनीकरण होणार असा संभ्रम निर्माण होण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली होती. संस्थानिक संघराज्यास अनुकूल झाले होते.

15 ऑगस्ट 1947 ला देश स्वतंत्र झाल्यानंतर दक्षिण संस्थानांच्या संघराज्याची निर्मिती करण्याच्या प्रक्रियेस गती आली. दक्षिणी संस्थाना पैकी फलटण, सांगली गटाच्या खटपटीमुळे औंध, भोर, फलटण, मिरज , मिरजमळा, सांगली, कुरूंदवाड व रामदुर्ग या संस्थानांच्या प्रमुखानी दि. 17 आक्टोबर 1947 रोजी भोर येथे संघराज्याच्या करारनाम्यावर सह्या केल्या. त्या बरोबर आठ दक्षिणी संस्थानांचे संघराज्य अस्तित्वात आले.

दि. 7 ऑक्टोबर 1947 च्या फलटण आज्ञापत्रिका मध्ये " संयुक्त दक्षिणी संस्थान " स्थापन करण्याच्या प्रश्नाबाबत दक्षिणी संस्थानाचे अधिपति व संस्थानातील जनता यांस प्रकट विनंती सदराखाली जाहीर प्रकटन केले आहे.

त्या निवेदनावर औंध , भोर, कुरूंदवाड, मीरज, फलटण , रामदुर्ग, सांगली, इत्यादी संस्थानिकांच्या सह्या आहेत."[55]

---

54 अ. वि. पटवर्धन –पृ. 28

55 फलटण आज्ञापत्रिका वर्ष 30 दि. 7 ऑक्टोबर 1947– विशेष अंक भाग –1

विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या--

महात्मा गांधीच्या वधानंतर निरनिराळया दंगलग्रस्त संस्थानी भागात मुंबई प्रांताच्या अधिका-यांना अंमल सुरू होणे अपरिहार्य झाले. दि.19-2-1948 रोजी मुंबई प्रांताचे मुख्यप्रधान श्री बाळासाहेब खेर यांच्या अघक्षतेखाली अक्कलकोट ,जत, फलटण,कुरूदंवाड , ( थोरली व धाकटी पाती ) सांगली, रामदुर्ग, मिरज, मिरजमळा, मुधोळ, सावनुर, वाडी, औंध ,भोर, व जमखिंडी या पंधरा संस्थानांच्या अधिपतींची सभा होऊन विलीनीकरणाच्या करारनाम्यावर संस्थानाधिपतींच्या सह्या झाल्या.

मुंबई प्रांताने संस्थानाचा ताबा घेतला----

दि.8-3-1948 रोजी दक्षिणी संस्थानापैकी कोल्हापूर व्यतिरिक्त बाकींची सर्व संस्थाने कारभारदृष्टया मुंबई प्रांतात अधिकृतरित्या सामील झाली. ज्या जिल्ह्यात जे संस्थान समाविष्ठ करण्यात आले, तेथील जिल्हाधिका-यांच्या हस्ते तिरंगी झेन्डा फडकविण्यात येऊन मुंबई प्रातांत संस्थाने सामील केल्याचे जाहीर करण्यात आले. दि.8-3-1948 पासून संस्थानिकांची सत्ता गेली पण त्यांचे मानमराबत राखण्याचे आश्वासन हिंदी सरकारने दिले,त्याच बरोबर 1945-46 च्या उत्पन्नाच्या 15 टक्के रक्कम संस्थानिकांच्या खाजगी खर्चासाठी देण्याचा करार करण्यात आला. "[56]

अशारितीने फलटण संस्थान मालोजीरावांनी मुंबई प्रांतात 8 मार्च 1948 ला विलीन केले त्यावेळी फलटण संस्थानची लोकसंख्या 71,473 असून क्षेत्रफळ 397 चौरस मैल व 73 खेडी समाविष्ठ होते. फलटण संस्थानचे वार्षिक उत्पन्न 15 लाख 14 हजार होते." [57] व मालोजीरावांना 1,40,442 रूपये तनखा निश्चित केला.[58]

---

56 कित्ता- पृ.96-97

57 अ.वि.पटवर्धन उपरिनिर्दिष्ट - पृ. 112

58 कित्ता- पृ.117

स्वंतत्र भारतात मालोजीराव राष्ट्रिय प्रवाहात सामील झालेले व कॉंग्रेसचे मंत्री बनले ,त्यांनी आपल्या पुढील आयुष्यात सुध्दा सर्व सामान्य जनतेची सेवा अखंडपणे केली व एक संस्थानकि कसा आदर्श लोकशाहीचा नेता बनु शकतो याचा घडा घालून दिला.